(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ.बाबासाहेब आंबडेकर आणि मजूर पक्ष

**प्रा.(डॉ) राजू कलमेश सावंत** राज्यशास्त्र विभागप्रमुख, नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज आर्ट्स अँड कॉमर्स, सांगली

---

**प्रस्तावना-:**

अनुसूचित जाती जमातींना विकासाच्या प्रक्रियेमध्ये आणण्यासाठी आणि त्यांच्या उत्थानासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय मौलिक असे कार्य केलेले आहे. अनुसूचित जाती जमातींवर असणारी बंधने दूर करण्यासाठी व त्यांचा लोकशाही प्रक्रियेमध्ये सहभाग होण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जे कार्य केले ते खऱ्या अर्थाने मौलिक स्वरूपाचे आहे. ज्यावेळी पुना करार झाला त्यावेळी अनुसूचित जाती जमातीचा आपला प्रतिनिधी पाठवण्याचा अधिकार पूर्णतः हिरावून घेतला गेला. त्यावेळचा पुना करार हा स्पर्धेने आणि वाईट गोष्टींनी भरलेला होता. यामागे महात्मा गांधीजी यांनी केलेले उपोषण कारणीभूत होते आणि त्याचे अतिशय वाईट परिणाम या अनुसूचित जाती जमातींना भोगावे लागले होते. काँग्रेस पक्षाचा वाढता मनमानी कारभार पाहता डॉक्टर बाबासाहेबांनी अस्पृश्य दलितांच्या उत्थानासाठी एक स्वतंत्र पक्ष असावा असा ध्यास धरला व त्यातूनच पुढे स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना झाली. त्यामुळे खऱ्या अर्थाने भारताच्या राजकारणाला कलाटणी मिळाली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि पक्षाची वाटचाल याचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे-:**

१.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेणे.

२.बाबासाहेब आंबेडकर आणि मजूर पक्षाचे स्थापनेची पूर्वपिटिका समजून घेणे.

३.मजूर पक्षांच्या ध्येय धोरणाचा व कार्यक्रमाचा अभ्यास करणे.

४.मजूर पक्षाचा जाहीरनामा आणि मजूर पक्षाने केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

**विषय प्रवेश-:**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि मजूर पक्ष या संशोधन पर लेखामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या मजूर पक्षांची ध्येयधोरणे मजूर पक्षाची कामगिरी व १९३७ मधील झालेल्या निवडणुकीत मजूर पक्षाचा विजय व मजूर पक्षाच्या कार्यक्रमाचा विचार करण्यात आलेला आहे.१९३७ मध्ये झालेल्या मजूर पक्षाने समाजातील दलित गरीब शेतकरी कामगार यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केलेला आहे.

**स्वतंत्र मजूर पक्ष-:**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये भारतामध्ये एकही एक बलाढ्य पक्ष अस्तित्वात नव्हता १९३६ पर्यंत काँग्रेस पक्षाचीच भारतीय राजकारणामध्ये अरे रवी होती. काँग्रेस पक्षाच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी बलाढ्य विरोधी पक्षाची किंवा काँग्रेस पक्षाला तोडीस तोड देईल असा पक्ष निर्माण होणे गरजेचे होते. त्यामुळेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी काँग्रेस पक्षाला समांतर असा एखादा विरोधी पक्ष स्थापन करावा हा विचार उरी बाळगून ते १९३६ पासूनच या कार्याला लागले होते. त्यावेळी १९३७ मध्ये कायदेमंडळाच्या निवडणूक होण्याची शक्यता होती त्यामुळे नवीन पक्ष स्थापन करावा असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते.१९३० ते १९३६ हा कालखंड काँग्रेस पक्षाच्या लोकप्रियतेचा कालखंड मानला जातो या कालखंडात काँग्रेस पक्षाचा भारतीय राजकारणामध्ये मोठा दबदबा होता. त्यामुळे कदाचित काँग्रेस पक्षाची एक पक्ष हुकूमशाही निर्माण होऊ नये याची भीती आंबेडकरांना वाटत होती. लोकशाहीचे अस्तित्व उठून दिसावे आणि त्या दिशेने या देशात पावले पडावीत म्हणून डॉ. आंबेडकरांनी काँग्रेस पक्षाला विरोधी पक्ष निर्माण केला तरच देशात लोकशाहीच्या वाढीला पोषक वातावरण निर्माण होईल हे ओळखले होते. याच हेतूने त्यांनी मजूर पक्षाची स्थापना करण्याचे ठरवले होते.

स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करण्याअगोदर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभा नावाची संघटना स्थापन केली. परंतु ही संघटना व तिचे कार्यक्षेत्र खूपच मर्यादित असे होते. मोठ्या प्रमाणात निवडणुका लढविण्यासाठी मोठ्या संघटनेची आवश्यकता होती कारण १९३५ चा कायदा नवे हिंदुस्थानात नवीन कायदेमंडळाच्या निवडणुका ह्या जानेवारी १९३७ मध्ये होणार होत्या. त्यामुळे या निवडणुका अस्पृश्यांच्या वतीने कशा लढवाव्या हा प्रश्न आंबेडकरांपुढे होता.१९२४ ते १९३५ च्या दरम्यान साहेबांनी अस्पृश्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी जी चळवळ राबविली ती बहिष्कृत

हितकारणी सभेच्या मार्फतच. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय पक्ष जातीय आधारावर न निर्माण करता त्यांनी कामगार शेतकरी यांच्या लढ्याशी अस्पृश्यांचा लढा संलग्न करण्याचे ठरविले.

स्वतंत्र मजूर पक्ष स्थापनेच्या कार्यात आंबेडकरांना अनेक व्यक्तींचे सहकार्य लाभले होते त्यामध्ये भाऊराव उर्फ दादा साहेब गायकवाड, डी व्ही प्रधान, आनंदराव चित्र टिपणीस, केंद्राळकर भोळे जाधव करण्याची प्रेरणा त्यांना इंग्लंडच्या मजूर पक्षांकडून मिळाली त्यासाठी त्यांनी इंग्लंडच्या मजूर पक्षाचा अभ्यास करून त्याच धर्तीवर भारताची परिस्थिती पाहून मजूर स्थापना करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी अनेक वेळा इंग्लंडला भेट दिल्या त्यातूनच त्यांना पक्षाची घटना कार्यक्रम ध्येयधोरणे ठरविली आणि अशा पद्धतीने डॉक्टर आंबेडकरांनी नव्या पक्षाचे नाव स्वतंत्र मजूर असे ठेवले.१९३५ च्या कायद्यान्वये प्रांतांना स्वायत्तता मिळाली होती त्यामुळे अनेक पक्षांचे राजकारणामध्ये उतरण्याचे प्रयत्न चालू होते तसेच आंबेडकरांनी देखील प्रयत्न चालू केले. अशा पद्धतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी १९३६ च्या ऑगस्ट महिन्यामध्ये स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. त्यासाठी त्यांनी स्वतःच्या पक्षाचा एक जाहीरनामा तयार केला त्यात त्यांनी भूमीहीन गरिबकुळे शेतकरी तरी आणि कामगार यांच्या निवडीची आवश्यकता त्यात मांडली. लोकशाही व्यवस्थेमध्ये विरोधी पक्षाला अनन्य साधारण महत्व असते ही गोष्ट डॉक्टर बाबासाहेब यांनी ओळखून स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला होता. विरोधी पक्ष हा लोकशाहीचा आत्मा मानला जातो. विरोधी पक्षामुळे लोकशाहीचा विकास व वाढ होते व्यक्ती स्वातंत्र्याचा विकास होतो. ही गोष्ट हेरूनच त्यांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला होता. या पक्षाचे मुख्यालय त्यांनी मुंबई येथे सुरू केले.स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनामापासून त्यांनी गरीबकुळे, मजूर, शेतकरी कामगार यांच्या न्याय हक्कासाठी लढा उभारला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पक्षाचे नाव स्वतंत्र मजूर पक्ष का ठेवले? या प्रश्नाची वारंवार बाबासाहेबांना विचारणा होत होती त्यावेळी डॉक्टरआंबेडकरांनी एक उत्तर दिले"आमच्या पक्षाचा कार्यक्रम हा मुख्यत्वे कामगार वर्गांच्या हितार्थ आहे म्हणून ही मजूर संघटना आहे. तसेच दलित वर्ग या शब्दाऐवजी मजूर हा शब्द योजनेचा एकच हेतू आहे तो म्हणजे मजूर वर्गात दलित या वर्गाचा समावेश होतो.

**स्वतंत्र मजूर पक्षाची उद्दिष्टे-**

**१.आर्थिक प्रश्न सोडवणे-:**

आर्थिक विषमता हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दारिद्र्याचे मुख्य कारण आहे ही गोष्ट बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखली होती. त्यासाठी त्यांनी आर्थिक सुधारणा होण्यासाठी काही उपाययोजना सुचवल्या होत्या त्यासाठी त्यांनी लॉर्ड मोर्गेस बँका शेतकरी उत्पादक सहकारी संघ व्यापारी सोसायटी यांची स्थापना आमचा पक्ष करेल असे आश्वासन दिले. शेतीचे तुकडे करण बंद झाले पाहिजे शेतीचे तुकडीकरण झाल्यामुळेच आज कृषी उद्योग अडचणीत सापडलेला आहे याचे देखील त्यांना भान होते म्हणून त्यांनी शेती व शेतीवर आधारित उद्योगांना चालना देण्याचे आश्वासन दिले.

लोकांची कुशलता आणि उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी आमचा पक्ष तांत्रिक शिक्षणाचा व्यापक उपक्रम हाती घेईल , खोत पद्धती व तालुकादारी पद्धती नष्ट करण्यासाठी आमचा पक्ष प्रयत्न करेल. कामगारांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांची बढती, बोनस पगारी रजा, कामाची कमी तास यासारखे सुविधा त्यांना देण्यात याव्या यासाठी आमचा पक्ष प्रयत्न करेल. तसेच कामगारांच्या कल्याणासाठी बेकारीच्या काळात, अपघाताच्या काळात मदत करण्यासाठी सोशल इन्शुरन्स नामक योजना मांडली. त्याचबरोबर लॉर्ड सेटलमेंट सुरू करण्यासा"ठी पक्ष प्रयत्न करेल त्यासाठी आमचा पक्ष योग्य ते कायदे करण्यासाठी प्रयत्न करेल त्याची ग्वाही यांनी दिली.

**२.घरातील असमानता दूर करणे-:**

करा मध्ये कपात करा या तत्त्वाचा प्रचार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केला समाजातील गौर गरीब जनतेतून कमीत कमी कर आकारावा त्यासाठी योग्य ती कर आकारणी व्हावी यासाठी आमचा पक्ष प्रयत्न करेल.

**३.सामाजिक सुधारणा-:**

सनातनी वर्गाने समाजसुधारकांना जाती बहिष्कृत करू नये, तसेच अनाठाई खर्च शिक्षणावर खर्च करावा, बेकार व भिकारी यांचा प्रश्न सोडवण्यासाठी कायदे करण्याचे काम आमचा पक्ष हाती घेईल अस्पृश्यता नष्ट करणारे कायदे आमचा पक्ष करेल याची ग्वाही दिली.

**४.ग्रामीण पुनर्रचनेसंबंधी पक्षाचा दृष्टिकोन-:** खेडी स्वायत्त करणे, टाऊन प्लॅनिंगच्या योजना राबवणे, खेड्यात आरोग्यविषयक सुविधा पुरवणे, खेड्याचा दृष्टिकोन आधुनिक करण्यासाठी तेथे वाचनालय हॉल रेडिओ रोटरी सिनेमा स्थापन करून ग्रामस्थांना प्रगतीपथावर पोहोचविणे.

**५.शिक्षण-:**

मोफत व सक्तीचे शिक्षण अमलात आणणे, साक्षरता मोहीम राबविणे, तांत्रिक शिक्षणावर भर देणे, प्रांतिक विद्यापीठांची पुनर्घटना करून प्रादेशिक शिक्षण देणारी विद्यापीठे स्थापन करणे. मागासलेल्या वर्गासाठी उच्च शिक्षण शासन खर्चाने करण्याची तरतूद करणे.

तसेच राज्यकारभार विषयक अनेक उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून हा पक्ष वाटचाल करणार होता. इसवी सन 1937 च्या निवडणुकीमध्ये मजूर पक्षाने आपले उमेदवार उभे करण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी पक्षाचा जोरदार प्रचार सुरू केला. मंत्र मधुर पक्षाच्या वतीने त्यांनी मुंबई कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी विशेषतः महाराष्ट्रातील जिल्ह्यातून वेगवेगळे प्रतिनिधी उभे केले होते त्यामध्ये जे डी जाधव, के एस सावंत, भाई चित्रे काळे, वराळे , स्वरूपा टिपणीस, बाबुराव भातणकर, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पीजी रोहम, शामराव परुळेकर, भाऊराव गायकवाड, धाडणे यांच्यासारखे जवळपास 1१७ प्रतिनिधी मजूर पक्षाने निवडणुकीसाठी उभे केले व १७ फेब्रुवारी १९३७ ला ती निवडणूक पार पडली या निवडणुकीत बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षा जास्त यश मिळाले. या १७ उमेदवारांपैकी १५ उमेदवार भरघोस अशा मतांनी निवडून आले त्यावेळी मुंबई कायदेमंडळात स्वतंत्र मजूर पक्ष हा एक प्रभावी असा गट होता व त्यांचे नेते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर होते त्यावेळी या मजूर पक्षाचा काँग्रेस पक्षावर मोठा दरारा होता. आणि या ठिकाणी त्यांच्या ध्येयाची पूर्ती झाल्याची आपणास दिसते.

**६.मजूर पक्षाची कामगिरी-:**

ज्या हेतूने किंवा ज्या ध्येयाने मजूर पक्षाची स्थापना झाली होती ते ध्येय निवडून आलेले प्रतिनिधी विसरले नव्हते निवडून आल्यानंतर त्यांनी त्याचप्रमाणे आपल्या कार्याला सुरुवात केली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सप्टेंबर 1937 मध्ये खोती विधेयक सुद्धा पुनर्र स्थापित केले. स्वतंत्र मजूर पक्षाची विधानसभेतील कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. स्वतंत्र मजूर पक्षाच्या ध्येयधोरणास अनुसरून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कायदेमंडळात महार वतन नष्ट करणारे आणि खोती शाही नष्ट करणारे बिल आणले या दोन्ही बिलाचा उद्देश समजावून सांगण्यासाठी त्यांनी कोकण दौरा केला. त्यानंतर हे बिल पारित झाले. स्वतंत्र मजूर पक्षाची पाय मुळे सामान्य लोकांमध्ये रुजण्यासाठी त्यांनी लोकांना आपल्या पिढ्यान पिढी या मजूर पक्षासोबत राहण्याचे आवाहन केले. दलित कामगार शेतकरी वर्गाच्या उन्नतीसाठी त्यांच्या हितासाठी या मजूर पक्षाने वारंवारिक काम केल्याचे दिसते.

**समारोप :**

थोडक्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मजूर पक्षाच्या माध्यमातून समाजातील दलित अस्पृश्य, कामगार शेतकरी यांच्या प्रश्नांना चव्हाट्यावर आणून त्यांना न्याय मिळवून देण्याचे ठरवले होते व त्या दृष्टिकोनातून त्यांनी या मागास वर्गाला योग्य प्रतिनिधित्व व त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळावा म्हणून स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला होता आणि त्याद्वारे त्यांनी त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे कार्य केल्याची दिसते. मजूर पक्षाची संघटनात्मक बांधणी मजूर पक्षाची ध्येय धोरणे यातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची दूरदृष्टी प्रतीत होते.

**संदर्भसूची :**

1. कीर धनंजय , "डॉ.बाबासाहेब आंबेडकर", चौथी आवृत्ती, पाप्युलर प्रकाशन, मुंबई,१९८४
2. खेरमोडे चांगदेव भगवानराव, "डॉ.भीमराव रामजी आंबेडक्र चरित्र", वाय.बी.कांबळे प्रकाशन समिती, मुंबई , १९६६
3. क्षीरसागर आर.के., "प्रबुध्द भारतातील आलेख", आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८०
4. कुलकर्णी भीमराव , "डॉ.बाबासाहेब आंबेडकर", सुविचार प्रकाशन, नागपूर,१९६६
5. कांबळे बी.सी., "समग्र आंबेडकर चरित्र", बी.सी.कांबळे प्रकाशन, मुंबई, १९८६